पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४६ वा | गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पावसाने फिरवली पाठ; जिल्ह्यात शेतकऱ्यांवर दुष्काळाचे सावट!

## खरीप पिके संकटात, रब्बीच्या पेरणीवरही टांगती तलवार!




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ८ जून रोजी मृग नक्षत्राच्या आगमनाने यंदाच्या पावसाळ्याला सुरुवात झाली असली तरी सोलापूर जिल्ह्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाळ्याचे जवळपास तीन महिने उलटत आले तरी जिल्ह्यात अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. अधूनमधून झालेल्या रिमझिम पावसाने जमिनीवर काही प्रमाणात ओलावा निर्माण झाला असला, तरी त्याचा खरीप पिकांना अपेक्षित फायदा झालेला नाही. परिणामी खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून, आता रब्बी हंगामाच्या पेरणीवरही पावसाचे सावट निर्माण झाले आहे.

यंदाच्या पावसाळ्यात मृग, आद्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा आणि मघा या महत्त्वाच्या नक्षत्रांत अपेक्षित स्वरूपाचा पाऊस झालेला नाही. काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसल्या असल्या तरी त्या अत्यल्प कालावधीच्या ठरल्या. मोठा पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील ओढे–नाले अद्याप कोरडेच असून, अनेक लहान–मोठ्या जलस्रोतांमध्ये पुरेसा पाणीसाठा झालेला नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

**खरीप पिकांची वाढ खुंटली**

पावसाच्या लहरीपणाचा सर्वाधिक फटका खरीप पिकांना बसला आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या सोयाबीन, मूग, उडीद, मका आणि तूर या पिकांवर पावसाअभावी परिणाम झाला आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे.

काही भागांत पिकांची पाने पिवळी पडत असून, जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके करपण्याच्या स्थितीत पोहोचली आहेत. पिकांच्या वाढीच्या आणि उत्पादनक्षमतेच्या दृष्टीने सध्याचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असताना पावसाचा खंड पडल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाने साथ न दिल्यास हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या अडचणीचा ठरण्याची शक्यता आहे.

**विहिरी, बोअरवेलची पाणीपातळी घटली**

पावसाअभावी केवळ पिकांवरच परिणाम झालेला नाही, तर ग्रामीण भागातील पाणीस्थितीवरही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. विहिरींच्या पाणीपातळीत घट होत असून काही भागांत बोअरवेलमधूनही पुरेसे पाणी मिळत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी बोअरवेल बंद पडण्याची वेळ आली आहे.

खरीप पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी उपलब्ध जलस्रोतांचा आधार घेत आहेत. मात्र, पाणीसाठा मर्यादित असल्याने प्रत्येक पिकाला आवश्यक तेवढे पाणी देणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाची एक दमदार सर येणे हीच शेतकऱ्यांसाठी मोठी आशा बनली आहे.

**रब्बीच्या पेरणीवरही संकट**

दरम्यान, ३० ऑगस्टपासून पूर्वा नक्षत्राला सुरुवात झाली असून आता शेतकऱ्यांचे लक्ष उत्तरा आणि त्यानंतर येणाऱ्या हस्त नक्षत्राकडे लागले आहे. सोलापूर जिल्ह्याच्या शेतीच्या दृष्टीने रब्बी हंगाम अत्यंत महत्त्वाचा आहे. रब्बीतील ज्वारी, हरभरा, गहू आणि अन्य पिकांच्या पेरणीसाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे.

पूर्वा, उत्तरा आणि हस्त नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाला तर जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण होऊन रब्बीच्या पेरणीला चालना मिळू शकते. मात्र, पावसाने अशीच पाठ फिरवली तर रब्बी हंगामाची सुरुवातच अडचणीत येण्याची शक्यता आहे.

आधीच खरीप पिकांचे नुकसान होत असताना रब्बीची पेरणीही लांबणीवर पडल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढू शकतात. त्यामुळे आगामी काही दिवसांतील पाऊस जिल्ह्याच्या शेतीसाठी निर्णायक ठरणार आहे.

**दुष्काळजन्य परिस्थितीची भीती**

महत्त्वाची पावसाची नक्षत्रे अपेक्षेप्रमाणे न गेल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होण्याची भीती वाढली आहे. अनेक भागांत ओढे–नाले वाहिलेले नाहीत. जलस्रोतांमध्ये पुरेसा पाणीसाठा झालेला नसल्याने आगामी काळात पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

पावसाचा खंड आणखी वाढल्यास खरीप पिकांचे नुकसान तर होईलच; शिवाय पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने आतापासूनच परिस्थितीचा तालुकानिहाय आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**आकाशाकडे लागले शेतकऱ्यांचे डोळे**

सोलापूर जिल्ह्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यातील अनिश्चिततेने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. खरीप पिकांना सावरण्यासाठी आणि रब्बीच्या पेरणीसाठी आता दमदार पावसाची नितांत गरज आहे.

उत्तरा आणि हस्त नक्षत्रात तरी पावसाने जोरदार हजेरी लावावी, जमिनीला पुरेसा ओलावा मिळावा आणि रब्बी हंगामाची पेरणी वेळेत सुरू व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. आगामी काही दिवसांत पावसाची स्थिती कशी राहते, यावर जिल्ह्यातील खरीप पिकांचे भवितव्य आणि रब्बी हंगामाची दिशा मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार आहे.

पाऊस पडला तर शेती वाचेल; अन्यथा खरीपच्या नुकसानीसोबत रब्बीचेही गणित बिघडण्याची शक्यता असल्याने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे डोळे आता अक्षरशः आभाळाकडे लागले आहेत.

# तीन दशकांच्या राजकीय संघर्षानंतर स्नेहभेट

## 'शिंदे-मोहिते' पुन्हा एकत्र येणार? चर्चांना उधाण

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** गेल्या तीन दशकांपासून शिंदे विरुद्ध मोहिते–पाटील असा राजकीय संघर्ष सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात सातत्याने चर्चेचा विषय राहिला आहे. आमदारकीपासून जिल्हा परिषद, डीसीसी बँक, ग्रामपंचायत आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत अनेक ठिकाणी दोन्ही घराणी आमनेसामने उभी राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, हृदय प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर माढ्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या निमगाव येथील निवासस्थानी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते–पाटील आणि माजी आमदार रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी घेतलेल्या भेटीने सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वतुर्ळात चर्चेला अक्षरशः उधाण आले आहे. ही भेट केवळ प्रकृतीची विचारपूस करण्यापुरती मर्यादित असली तरी, दशकांपासून परस्परांचे राजकीय विरोधक असलेली दोन बलाढ्य घराणी पुन्हा जवळ येणार का? याबाबत राजकीय चर्चांना सुरुवात झाली आहे.

माढा, माळशिरससह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात अनेक निवडणुकांमध्ये शिंदे आणि मोहिते–पाटील हे एकमेकांच्या विरोधात राजकीय मैदानात उतरल्याचे चित्र राहिले आहे. ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषद, सहकारी संस्था, डीसीसी बँक आणि विधानसभा–लोकसभा निवडणुकांपर्यंत या दोन घराण्यांच्या राजकीय संघर्षाचे पडसाद उमटले आहेत. अनेकदा पक्षीय समीकरणांपेक्षाही स्थानिक पातळीवरील 'मोहिते विरुद्ध शिंदे' हीच राजकीय ओळख अधिक प्रभावी ठरल्याचे पाहायला मिळाले. मात्र, राजकारणातील संघर्ष बाजूला ठेवत विजयसिंह मोहिते–पाटील आणि रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी बबनदादा शिंदे यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. बबनदादांनी केलेल्या हृदय प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीची माहिती घेत लवकरात लवकर ते पूर्णपणे बरे व्हावेत, अशा शुभेच्छा मोहिते–पाटील यांनी व्यक्त केल्या. वरकरणी ही सदिच्छा भेट असली तरी तिच्या राजकीय अर्थावर सध्या जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. दोन्ही घराण्यांमध्ये अनेक वर्षांपासून व्यक्तिगत स्नेह आणि ऋणानुबंध असल्याचेही बोलले जाते. राजकीय पातळीवर कितीही मतभेद असले तरी वैयक्तिक नात्यांमध्ये कटुता येऊ न देणे, ही या दोन्ही घराण्यांची परंपरा असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. त्यामुळे निमगावातील ही भेट राजकीय संघर्षाच्या पलीकडील नात्याची प्रचिती देणारी ठरली आहे.



आगामी काळात माढा लोकसभा मतदारसंघासह सोलापूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलली आणि शिंदे–मोहिते–पाटील एकाच राजकीय व्यासपीठावर आले तर त्याचा परिणाम जिल्ह्याच्या राजकारणावर मोठ्या प्रमाणात होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू झाली आहे. मात्र, या भेटीला सध्या कोणताही राजकीय निर्णय किंवा युतीचा अधिकृत संकेत मानता येणार नसला तरी, दोन बलाढ्य राजकीय घराण्यांची ही जवळीक भविष्यात कोणते नवे राजकीय समीकरण जन्माला घालते, याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**तीन दशकांचा संघर्ष... एका भेटीने चर्चेला उधाण!**

शिंदे–मोहिते–पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत; मात्र बबनदादांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी झालेल्या भेटीने जुन्या समीकरणांना नव्याने चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे

# 'अच्छे दिन' कुठे गेले? महागाईविरोधात राष्ट्रवादीचा सरकारला सवाल

## गॅस, इंधन, दूध, साखरेच्या दरवाढीविरोधात राष्ट्रवादी आक्रमक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक, गृहिणी आणि मध्यमवर्गीयांचे आर्थिक गणित कोलमडले असून, केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर शहर व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. महागाईच्या निषेधार्थ पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महागाईने आधीच होरपळलेल्या जनतेवर विविध वस्तूंच्या दरवाढीचा आणखी एक भार टाकण्यात आला आहे. मुंबई व परिसरात सीएनजीच्या दरात प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ होऊन दर ८८ रुपयांवर पोहोचल्याचा दावा करण्यात आला आहे. त्याचबरोबर घरगुती तसेच व्यावसायिक एलपीजीच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांसह हॉटेल व खानावळ व्यावसायिकांवरही आर्थिक बोजा वाढणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

इंधन दरवाढीचा थेट परिणाम रिक्षा, टॅक्सी आणि मालवाहतूक क्षेत्रावर होत असून, त्यातून प्रवासी व मालवाहतूक भाडेवाढीचा भार अखेर सर्वसामान्यांच्या खिशावर पडत आहे. दूध, साखर, गूळ, खाद्यतेल आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या



वाढत्या किमतींमुळे कुटुंबांचे मासिक बजेट विस्कळीत झाल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

'अच्छे दिन'चे आश्वासन देणारे सरकार जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रणात ठेवण्यात अपयशी का ठरत आहे? असा सवाल उपस्थित करत, इंधनावरील सेस आणि इतर कर कमी करून जनतेला तातडीने दिलासा देण्याची मागणी करण्यात आली. निवडणुका संपल्यानंतर महागाईचा भार जनतेवर टाकला जातो का, असा प्रश्नही निवेदनातून उपस्थित करण्यात आला.

साखरेच्या वाढत्या दराबाबतही निवेदनात चिंता व्यक्त करण्यात आली. ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात वाढ होणे संशयास्पद असल्याचा आरोप करत, बाजारातील दरवाढीवर सरकारने प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशी मागणी करण्यात आली.

महागाई नियंत्रणात आणणे सरकारला शक्य असून त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, इंधनावरील कर कमी करावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी, युवती प्रदेश उपाध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, शहराध्यक्ष सुनंदा आपटे, रूपाली पवार, जिल्हा उपाध्यक्ष मस्के, शहराध्यक्ष महेश गादेकर, शहर जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, ओबीसी सेल अध्यक्ष बिराप्पा बंडगर, सामाजिक न्याय सेल अध्यक्ष अजित पात्रे, सोशल मीडिया दक्षिणचे मल्हार शिंदे, सौ. सुनंदा उमाटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरवाढीचा फटका थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापासून प्रवासाच्या खर्चापर्यंत बसत असल्याने सरकारने केवळ घोषणांवर न थांबता महागाई कमी करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# 'शक्तिपीठ'साठी संयुक्त मोजणी १५ सप्टेंबरपासून



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शक्तिपीठ महामार्गाची संयुक्त मोजणी १५ सप्टेंबरपासून सार्वजनिक बांधकाम आणि कृषी विभागासह संबंधित यंत्रणांच्या वतीने सुरू होणार आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादन प्रक्रिया हाती घेतली जाईल, अशी माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी दिली.

महामार्गाच्या नव्या रेखांकनानुसार ड्रोन व्हिडिओग्राफी, सॅटेलाइट इमेजच्या साह्याने जीपीएस लोकेशनसह सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

यामुळे बाधित क्षेत्रातील झाडे, फळबागा, घरांचे बांधकाम, जमिनीची 'एन. ए.' स्थिती, विहिरी, बोअरवेल यांची नोंद घेतली जाईल, ज्यामुळे बाधितांना योग्य नुकसानभरपाई देणे शक्य होणार आहे.

जुने रेखांकन रद्द झाल्यानंतर नव्या मार्गाची मोजणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. १५ सप्टेंबरपासून नोंदी घेतल्या जातील आणि निधी उपलब्ध होताच बाधितांना मोबदला वाटप सुरू केले जाईल.

**सोलापुरातील शक्तिपीठ महामार्ग दृष्टिक्षेपात**

- जिल्ह्यातील लांबी १२९ किलोमीटर
- एकूण आवश्यक भूसंपादन १८६५ हेक्टर
- बाधित तालुके बार्शी, माढा, पंढरपूर, माळशिरस
- बाधित गावे ४३ गावे
- खासगी क्षेत्र १८३५ हेक्टर
- शासकीय क्षेत्र ४६ हेक्टर
- वनविभाग क्षेत्र ४ हेक्टर

# SIR अंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचा अंतिम मतदार यादीत समावेश होणार– जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

## अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात 17 जून 2026 रोजी एकूण मतदार संख्या 39,41,095 इतकी होती. विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत मतदारांची संख्या 33,18,424 इतकी झाली आहे. या प्रारूप यादीसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या अरऊऊयादीत 6,22,671 मतदारांचा समावेश आहे. अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून, त्यामध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदार म्हणून समावेश करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात रक्रसंदर्भात आयोजित




राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले की, 31 ऑगस्ट 2026 रोजी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी उपजिल्हा निवडणूक कार्यालयातून प्रारूप मतदार याद्या घेऊन जाव्यात. तसेच मतदार यादीबाबत काही दावे अथवा हरकती असल्यास त्या विहित मुदतीत दाखल कराव्यात. SIR अंतर्गत जिल्ह्यातील एकही पात्र नागरिक मतदार यादीतून वगळला जाणार नाही, या दृष्टीने प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात यापूर्वी 3,723 मतदान केंद्रे होती. त्यामध्ये 17 नवीन मतदान केंद्रांची वाढ झाली असून, आता जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रांची संख्या 3,740 झाली आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दिली.

बैठकीत उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मतदार यादीत अनुपस्थित अथवा स्थलांतरित झालेल्या मतदारांना पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत माहिती विचारली. तसेच एकाच कुटुंबातील सदस्यांचे मतदान केंद्र शक्यतो एकच राहील, या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

(पान 2 वर..)

# मोहोळ तालुका बनावट दारूचे 'हब' बनतोय का?

## एकाच महिन्यात दुसरी कारवाई; बनावट दारूच्या धंद्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** मोहोळ तालुक्यात बनावट दारू निर्मिती व विक्रीविरोधात एकाच महिन्यात दुसरी कारवाई झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. वारंवार बनावट दारूचे अड्डे व कारखाने उघडकीस येत असतील, तर हा प्रकार केवळ एखाद्या गावापुरता मर्यादित नसून मोहोळ तालुका बनावट दारूच्या अवैध व्यवसायाचे केंद्र बनत चालला आहे का, असा गंभीर सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

बनावट दारूच्या निर्मितीत वापरल्या जाणाऱ्या घातक व निकृष्ट दर्जाच्या रसायनांमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अशा दारूच्या सेवनामुळे विषबाधा, यकृत व मूत्रपिंडांवरील परिणाम, दृष्टीसंबंधी समस्या यांसह गंभीर आरोग्यविषयक परिणाम होण्याची शक्यता असते. काही प्रकरणांमध्ये विषारी दारूमुळे मृत्यूही झाल्याच्या घटना राज्यात यापूर्वी समोर



आल्या आहेत. त्यामुळे मोहोळ तालुक्यातील या प्रकाराकडे केवळ अवैध दारूविक्री म्हणून न पाहता जनतेच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.

विशेष म्हणजे, एका महिन्याच्या कालावधीत बनावट दारूविरोधात दुसरी मोठी कारवाई होत असेल, तर या कारवायांपूर्वी संबंधित यंत्रणांना याची माहिती का मिळाली नाही, हा प्रश्न अधिक गंभीर बनतो. अवैध दारू निर्मितीचा व्यवसाय काही दिवसांत उभा राहत नाही. त्यासाठी जागा, कच्चा माल, साहित्य, वाहतूक आणि विक्रीचे जाळे आवश्यक असते. मग स्थानिक गुन्हे शाखा आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नजरेआड हा प्रकार इतका काळ कसा सुरू राहिला? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

कारवाई झाल्यानंतर संबंधित आरोपींवर गुन्हे दाखल करून प्रकरण संपविण्यापेक्षा या अवैध व्यवसायाच्या मुळापर्यंत जाणे आवश्यक आहे. बनावट दारू तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल कुठून येतो? तयार दारू कोणत्या भागात वितरित केली जाते? या व्यवसायामागे आणखी कोणाचा सहभाग आहे? यापूर्वी अशाच प्रकारच्या कारवायांमध्ये सापडलेल्या व्यक्तींचे काही कनेक्शन आहे का? या सर्व बाबींचा सखोल तपास होणे गरजेचे आहे.

मोहोळ तालुक्यातील नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या प्रकाराला वेळीच आळा घातला नाही, तर भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या कार्यपद्धतीचीही तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**केवळ कारवाई नव्हे, 'स्रोत' शोधा!**

बनावट दारूचा कारखाना सापडणे ही कारवाईची सुरुवात आहे; शेवट नव्हे. या धंद्यामागील संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी

(पान 2 वर..)

## संपादकीय

# ७.८ टक्के वाढीचा सुखद संकेत, पण आव्हाने कायम

नव्या आर्थिक वर्षातील पहिल्याच तिमाहीत एकूण देशांतर्गत उत्पादनाने (जीडीपी) नोंदवलेली ७.८ टक्के वाढ ही अर्थव्यवस्थेतील स्थैयार्ची हमी आहे. विशेषतः पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थिती, इंधनाचा तुटवडा-दरवाढ आणि पुरवठा साखळीतील अडचणी आदींमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था हेलकावे खात असताना भारताने रिझर्व्ह बँक आणि अर्थतज्ज्ञांच्या अंदाजाहून अधिक वेगाने वाढ नोंदवली, हा सुखद संकेतच. देशांतर्गत मागणी आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात केलेले खर्च, सरकारी गुंतवणुकीचा कायम राहिलेला ओघ आणि धोरणात्मक लवचीकता यांना त्याचे श्रेय जाते.

पुढील तिमाहीतही सणावारांच्या खरेदीचा अर्थव्यवस्थेला आधार मिळण्याचा अंदाज आहे; मात्र मान्सूनच्या कमी-अधिक प्रमाणाचा अन्नधान्य उत्पादन, पयार्याने ग्रामीण अर्थव्यवस्था व महागाईवर काय परिणाम होणार, यावर लक्ष ठेवावे लागेल.

इराण-अमेरिका युद्ध आणि इंधनटंचाई सुरू झाल्यानंतर, प्रारंभी जाणवलेला इंधन व गॅसचा तुटवडा वगळता भारताला या युद्धाच्या तीव्र झळा लागलेल्या दिसत नाहीत, असे यातून ढोबळमानाने म्हणता येते. या काळात सेवा क्षेत्राने अपेक्षेप्रमाणे दहा टक्के वाढ दर्शवून यात भरीव वाटा उचलला आहे. त्यामध्ये बँकिंग, विमा, वित्त-गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान, व्यापार, हॉटेल आणि पर्यटन-वाहतूक यांची कामगिरी चांगली राहिली. उत्पादन क्षेत्राचीही वाढ ७.७ टक्के आहे. मात्र, शेती क्षेत्राच्या वाढीचा वेग केवळ ३.६ असून गेल्या वर्षी याच तिमाहीतील ४.४च्या तुलनेत तो निराशाजनक म्हणावा लागेल. विशेषतः गव्हाच्या उत्पादनात केवळ अर्ध्या टक्क्याने झालेली वाढ चिंतेचा विषय ठरू शकते. या तिमाहीत ह्यरिअल जीडीपीह्ण ८१.३६ लाख कोटी रुपये होता.

अर्थतज्ज्ञांचे अंदाज सात टक्क्यांचे असताना, त्याहून झालेली वाढ अर्थव्यवस्थेतील स्थैर्य आणि विश्वासाचेही निदर्शक आहे. जीडीपीसह वस्तू व सेवाकराच्या (जीएसटी) संकलनातील पंधरा टक्के वाढही समाधानकारक आहे. सेवा आणि उत्पादन क्षेत्रातील वाढीमुळे भविष्यात रोजगारसंधी निर्माण होऊ शकतात, तर दुसरीकडे शेतीक्षेत्राची मंद वाढ, महागाई आणि युद्धस्थितीचा अर्थव्यवस्थेवर ताण येऊ शकतो, असे हे दुहेरी चित्र म्हणता येईल.

करोनाच्या साथीनंतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाल्या. भारतावरही त्याचे परिणाम झाले असले, तरी तुलनेने आपली अर्थव्यवस्था लवकर सावरली. मात्र, त्यानंतरही विविध तणावांमुळे जगभरात मंदीचे सावट आहे. त्या पार्श्वभूमीवर पहिल्या तिमाहीतील या कामगिरीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री सीतारामन यांच्यासह सरकारच्या वतीने समाधान व्यक्त करून विरोधकांवर टीकास्त्र सोडण्यात आले आहे. दुसरीकडे विरोधक ह्यहा विकास असेल, तर महागाई, बेरोजगारी आणि विषमता इतकी टोकाला का गेली आहे,ह्ण असा सवाल विचारत आहेत. टीकाकारांच्या मते हे आकडे भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान उद्योगांचा नफा आणि उच्च व उच्च मध्यमवर्गाच्या उत्पन्न-खर्चामध्ये फिरणारे आहेत. या राजकीय भूमिकांच्या पलीकडे जाऊन पाहिले, तरी या आर्थिक विकासाचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणे, हे आव्हान निरंतर राहणारे आहे, याविषयी दुमत नसावे.

गेल्या काही दिवसांमध्ये दूध, साखरेसह विविध जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईत वाढ होत आहे; त्या पार्श्वभूमीवर व्याजदरांमध्ये वाढीचा निर्णय झाला, तर त्याचा विकासदरावर परिणाम होण्याची भीती आहे. त्याशिवाय पश्चिम आशियातील तणाव अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. भविष्यात इंधनाचा तुटवडा कायम राहिल्यास इंधनाची दरवाढ, वाहतूक खर्चातही वाढ आणि महागाईत भर किंवा सरकारवर अनुदानाचा मोठा बोजा पडू शकतो.

रुपयाची घसरण सुरूच असून, नियार्तीमध्येसुद्धा फारशी आशादायक कामगिरी नाही. नजिकच्या काळातही जगभरातील स्थिती सुधारण्याची शक्यता धूसर असल्याने देशांतर्गत मागणीवर विसंबून राहावे लागणार आहे. त्यासाठी दरडोई उत्पन्न वाढून बाजारपेठ विस्तारणे आणि मागणीत वाढ महत्त्वाची ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर कर्मचारी कपातीचे ढग घोंगावत असून सेवा क्षेत्राची कामगिरी टिकवण्याचे मोठे आव्हान असेल. त्याबरोबरच पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक प्रामुख्याने सरकारी आहे. भविष्यकाळात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अथक प्रयत्न करण्याचा संदेशही या आकड्यांनी दिला आहे.

# निसर्गापुढे मानव हतबल; तरीही जगण्याची जिद्द अमर !

नेपाळमधील तिबेटच्या सीमेवर असलेल्या चार जिल्ह्यांमध्ये बुधवारी अचानक आलेल्या पुरामुळे ४५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, २,००० पेक्षा अधिक जण बेपत्ता झाले आहेत. तिबेटमध्ये सुरू असलेली अतिवृष्टी आणि हिमस्खलनामुळे नद्यांचे प्रवाह बदलले आणि त्याचा मोठा फटका नेपाळला बसला. या महापुरामुळे तेथील पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत.

तिबेट-नेपाळ सीमा भागात भूकंप होऊन हिमसंचय खचला आणि बफार्चे मोठे खडक नेपाळमधील लेंडे खोला नदीत आल्यामुळे पूर आला असावा, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. लेंडे खोला नदी नेपाळ आणि तिबेट या दोन्ही देशांमधून वाहते. ती भोटे कोशी नदीची उपनदी आहे.

नेपाळमधील या महापुराने केलेला विध्वंस पाहिल्यानंतर एक गोष्ट प्रकषार्ने जाणवते—मानव कितीही प्रगत झाला, तरी तो निसगार्पुढे अखेर हतबलच आहे. मानवी क्षमतांना मयार्दा आहेत, हे माणसाला माहीत असते; मात्र त्या मयार्दांची सतत जाणीव ठेवून जगणेही शक्य नसते. कारण आपण सतत भूकंप, महापूर, अंतरिक्षातून पृथ्वीवर अचानक येऊन आदळू शकणाऱ्या खगोलीय वस्तूंपासून होणारा विध्वंस, कोरोना विषाणूसारख्या महामारी, वादळे आणि इतर नैसर्गिक संकटांचा विचार करत बसलो, तर आपले दैनंदिन जगणेच कठीण होऊन बसेल.

म्हणूनच येणाऱ्या प्रत्येक नैसर्गिक संकटाला धैयार्ने तोंड देणे एवढेच आपल्या हातात आहे. त्याचबरोबर संकटाची चाहूल लागताच आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य सुरू करणे, संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी तत्परतेने उपाययोजना करणे आणि संकटग्रस्तांना सुरक्षित स्थळी पोहोचवणे, हेही आपण करू शकतो. संकटाच्या काळात होणारी जीवित आणि मालमत्तेची हानी शक्य तितकी कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, हे सक्षम आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. अर्थात, यामध्ये मानवी जीविताचे रक्षण हीच सर्वोच्च प्राथमिकता असली पाहिजे.

मानवी जीवनात काही संकटे नैसर्गिक असतात, तर काही संकटे मानवनिर्मित असतात. दंगल, आग, युद्धे, अपघात यांसारख्या घटना मानवी चुका, निष्काळजीपणा किंवा जाणूनबुजून विध्वंस करण्याच्या प्रवृत्तीतून घडतात. निसर्गाच्या संकटांवर आपले नियंत्रण नसले, तरी मानवनिर्मित संकटे कमी करण्याची जबाबदारी मात्र माणसाचीच आहे.

मानवी जीवन अनमोल आहे. प्रत्येक व्यक्तीचा पहिला अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार. 'सिर सलामत तो पगडी पचास' या म्हणीप्रमाणे, जिवंत राहिलो तरच पुढील अनेक संधींचे दरवाजे आपल्यासाठी खुले होतात. खरं तर, जीवन स्वच्छंदीपणे जगणे हीसुद्धा एक मोठी मौज आहे. मिळणारा प्रत्येक क्षण, प्रत्येक श्वास आणि प्रत्येक वेळी मनात निर्माण होणारे विचारांचे भावतरंग हीदेखील निसर्गाचीच देणगी आहे.

मानवी जगण्याबाबत तत्त्ववेत्त्यांपासून जीवशास्त्रज्ञ, वैद्यकीय व्यावसायिक, कवी आणि लेखकांपर्यंत अनेकांनी आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रानुसार विविध दृष्टिकोन मांडले आहेत. कवी आणि लेखकांनी जगणे अर्थपूर्ण करण्यावर विशेष भर दिला आहे. म्हणूनच कवी मंगेश पाडगावकर यांच्या 'शतदा प्रेम करावे' या कवितेतील शेवटच्या ओळी जगण्याविषयीची विलक्षण सकारात्मक भावना व्यक्त करतात—

"या ओठांनी चुंबुनि घेईन
हजारदा ही माती
अनंत मरणे झेलून घ्यावी
इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळपानावरती
अवघे विश्व तरावे
या जन्मावर, या जगण्यावर
शतदा प्रेम करावे "

जगणे स्वाभिमानाचे असावे. पराधीनतेत जगणे म्हणजे जिवंतपणी मृत्यू भोगण्यासारखे आहे, असेही अनेक विचारवंतांनी मानले आहे. निसर्ग सर्वशक्तिमान आहे. तो माणसाला आनंद देतो, तसेच दुःख आणि संकटेही देतो. निसर्गाच्या या द्वंद्वात्मक रूपाचा स्वीकार करूनच माणसाला जीवनाचा खरा अर्थ समजून घेता येतो.

तत्त्ववेत्त्यांनी मानवी विचारप्रक्रियेचा सखोल अभ्यास केला आहे. मानवी विचारचक्र हे असे अद्भुत साधन आहे, जे सतत फिरत असते आणि त्यातून नवनिर्मितीबरोबरच अफाट आणि अचाट कल्पनांचा जन्म होतो. माणसाचे जीवन अशाश्वत आहे आणि मृत्यू त्याचा सतत पाठलाग करत असतो. तरीही माणूस जगण्यासाठी धडपडतो. या धडपडीमागची प्रेरणा समजून घेणे म्हणजेच मानवी जीवनाचा अन्वयार्थ समजून घेणे होय.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी माणसाच्या या अशाश्वत जीवनाचे आणि जगण्यासाठीच्या संघषार्चे अत्यंत प्रभावी वर्णन १९५८ मध्ये झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनातील आपल्या भाषणात केले आहे. ते म्हणतात—

"माणूस जगतो का? नि जगण्यासाठी एवढा धडपडतो का? याचा विचार करणे जरुरी आहे. त्या धडपडणाऱ्या पतिताला आम्ही भित्रा समजतो, तो उंच गगनाला गेलेल्या विद्युतमय मनोऱ्यावर उभे राहून विजेच्या तारा जोडतो, खाणीत उभ्या कड्यावर चढून सुरुंगाला पेट देतो किंवा पोलादाच्या रस करणाऱ्या भट्टीवर तो निर्भय वावरतो आणि या सर्व ठिकाणी मृत्यू त्याची वाट पाहत असतो. कधी कधी त्याची आणि मृत्यूची गाठ पडून हा दलित कष्ट करीत करीत मरण पत्करतो. ही जगण्याची नि मरण्याची आगळी रीत आहे. ती लेखकाने समजून घ्यावी. सुरूंगाला पेट देता देता किंवा पोलादाच्या रसात बुडून मरणे, नाही तर विजेच्या धक्क्याने मरणे, दिवाळे निघाले म्हणून शेअर बाजारात मरणे या मरणातील अंतर लेखकाने मोजून पाहावे नि श्रेष्ठ मरण कोणते ते निश्चित ठरवावे."

मानवी जगण्याचा आणि मरण्याचा अन्वयार्थ इतक्या अजोड पद्धतीने मांडणारे अण्णाभाऊ साठे हे मानवतावाद जपणारे महान लेखक होते. म्हणूनच त्यांच्या साहित्याचा आणि विचारांचा प्रभाव पुढील अनेक शतके अनेक पिढ्यांवर राहणार आहे.

वैद्यकीय क्षेत्रातही मानवी जीवनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी डॉक्टर आणि परिचारिका शेवटच्या क्षणापर्यंत आटोकाट प्रयत्न करतात. एखाद्या दुर्धर आजाराने शेवटची घटका मोजणाऱ्या रुग्णाचे हृदय बंद पडले, तरी त्याला पुन्हा जीवनदान मिळावे यासाठी वैद्यकीय पथक शेवटपर्यंत प्रयत्नशील राहते. एका जीवासाठी केलेला प्रत्येक प्रयत्न हा माणुसकीचा विजय असतो.

कालच्या महापुरात एका ९७ वर्षीय वृद्ध आजींना रेस्क्यू टीमने जिवंत आणि सुखरूप बाहेर काढल्याची चित्रफीत पाहायला मिळाली. त्या आजींच्या चेहऱ्यावरचा आनंद एखाद्या विजेत्या योद्ध्याच्या आनंदासारखा वाटत होता. संकटातून सुखरूप बाहेर पडण्याचा तो क्षण केवळ एका व्यक्तीच्या बचावाची घटना नव्हती; तो जगण्याच्या अदम्य इच्छाशक्तीचा विजय होता. अशा अनेक हृदयस्पर्शी कहाण्या पुढील काही दिवसांत आपल्याला पाहायला आणि ऐकायला मिळतील.

निसर्गाची शक्ती अफाट आहे. मानवाने विज्ञानाच्या बळावर निसर्गाची अनेक रहस्ये उलगडली आहेत; आकाशाला गवसणी घातली, समुद्राच्या तळाशी पोहोचला आणि अंतरिक्षातही आपली पावले उमटवली. तरीही निसर्गाच्या एखाद्या अनपेक्षित रूपासमोर त्याची सारी ताकद क्षणात अपुरी ठरू शकते. म्हणूनच निसर्गावर विजय मिळवण्यापेक्षा निसगासीबत समतोल साधून जगणे अधिक महत्त्वाचे आहे.

महापूर असो, भूकंप असो, वादळ असो किंवा महामारी—संकट कोणत्याही रूपात येऊ शकते. संकट येणे आपल्या हातात नसले, तरी संकटाच्या वेळी माणूस म्हणून एकमेकांच्या मदतीला धावून जाणे नक्कीच आपल्या हातात आहे.

निसर्ग मोठा आहे, संकटे मोठी आहेत; पण जगण्याची माणसाची जिद्द त्याहून मोठी आहे.

प्रत्येक श्वास ही निसर्गाची देणगी आहे आणि प्रत्येक जीव वाचवणे ही मानवतेची जबाबदारी आहे.



– **किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

पान १ वरून

## SIR अंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचा...

**SIR कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक**

जिल्ह्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमासाठी सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटी 30 जून ते 17 ऑगस्ट 2026 या कालावधीत घेण्यात आल्या. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना 24 ऑगस्ट 2026 रोजी करण्यात आली. प्रारूप मतदार यादी 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, दावे व हरकती दाखल करण्यासाठी 30 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर 29 ऑक्टोबर 2026 पर्यंत सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार आहे.

**मतदारसंघनिहाय मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण**

रक्फ़ अंतर्गत जिल्ह्यातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रांची संख्या 3,740 झाली आहे. यामध्ये 17 नवीन मतदान केंद्रांचा समावेश असून, 39 मतदान केंद्रे विलीन करण्यात आली आहेत. तसेच 27 मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आला आहे. सर्वाधिक बदल सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात झाले असून, या मतदारसंघात 3 नवीन मतदान केंद्रे सुरू करण्यात आली, 11 मतदान केंद्रे विलीन करण्यात आली, तर 7 मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आला आहे.

**प्रारूप मतदार यादीतील आकडेवारी–**

17 जून 2026 रोजी जिल्ह्यातील एकूण मतदार संख्या 39,41,095 होती. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत ही संख्या 33,18,424 इतकी झाली आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या 17,09,471, महिला मतदारांची संख्या 16,08,709, तर तृतीयपंथी मतदारांची संख्या 244 इतकी आहे.

**ASDD मतदार यादी–**

31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अरऊऊयादीत एकूण 6,22,671 मतदारांचा समावेश आहे. यामध्ये मृत्यू झालेल्या 1,70,696 मतदारांचा, आधीच नोंद असलेल्या 1,05,941 मतदारांचा, अनुपलब्ध अथवा अनुपस्थित 1,34,302 मतदारांचा, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या 2,10,391 मतदारांचा, तर इतर कारणांमुळे 1,403 मतदारांचा समावेश आहे.

**सुनावणी व नोटिसा–**

31 ऑगस्ट 2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये 5,09,067 मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती अथवा मॅपिंगचा अभाव आढळून आला आहे. अशा प्रकरणांमध्ये नोंदीतील अनियमितता, नोंदणीचा अभाव, नवीन मतदार नोंदणीसाठी फॉर्म क्रमांक 6, दुरुस्ती अथवा स्थलांतरासाठी फॉर्म क्रमांक 8 आणि नाव वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक 7 यासंदर्भात आवश्यकतेनुसार नोटिसा देण्यात येणार आहेत.

संकेत स्थळे –प्रारूप मतदार यादी पाहण्यासाठीः https://solapur.gov.in/en/notice/special-intensive-revision-2026-draft-eletoral-roll/ (solapur.gov.in in Bing)

ASDD यादी पाहण्यासाठीः https://solapur.gov.in/en/notice/asdd/ (solapur.gov.in in Bing)

ऑनलाइन नाव नोंदणीसाठीः https://voters.eci.gov.in/ (voters.eci.gov.in).

## प्रत्येक तालुक्यात दोन मॉडर्न, तीन आदर्श शाळा होणार- कुशल जैन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे, अशी स्पष्ट भूमिका जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत मांडली.

पत्रकार परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पत्रकारांशी संवाद साधत जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाची माहिती दिली. पत्रकारांनी शिक्षण, आरोग्य, घरकुल तसेच अन्य महत्त्वाच्या विषयांवर विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तावाढीसाठी जिल्ह्यात पाच आदर्श शाळा विकसित करण्याचे नियोजन असल्याचे जैन यांनी सांगितले. यामध्ये तीन नियमित जिल्हा परिषद शाळा, एक पीएम श्री शाळा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा एक अशा पाच शाळा विकसित करण्याचा



मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषद अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासनाच्या समन्वयातून हा उपक्रम पुढे नेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य विभागाच्या कामगिरीचा आढावा देताना मुख्य कार्यकारी अधिकारी जैन यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ३५ आरोग्य केंद्रांना आतापर्यंत ठदअर प्रमाणपत्र प्राप्त झालेआहे. आता ही संख्या १०० पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना जैन यांनी सविस्तर माहिती देत विभागाच्या आगामी नियोजनाची माहिती दिली.

शिक्षण विभागासाठी महत्त्वाची माहिती देताना जैन यांनी सांगितले की, जिल्ह्यात नव्याने ३५५ शिक्षक रुजू होणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची उपलब्धता वाढून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणखी चालना मिळणार आहे.

शाळांमध्ये वितरित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबतही पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी गणवेशाचा दर्जा आणि प्रत्यक्ष वितरण याबाबत शिक्षण विभागाला सूचना देण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे उपस्थित होते. शिक्षण विभागाशी संबंधित पत्रकारांच्या विविध प्रश्नांना विशाल मुळे यांनी सविस्तर उत्तरे देत विभागाच्या कामकाजाची माहिती दिली.

शिक्षकांच्या उल्लेखनीय कायार्ची दखल घेण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर शिक्षक पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहितीही मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली. ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कायार्चा गौरव व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेत ग्रामीण भागातील घरकुल योजनांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळावा आणि प्रलंबित कामांना गती मिळावी, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक पाठपुरावा केला जात असल्याचे जैन यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेमध्ये विविध माध्यमांच्या प्रतिनिधींनी शिक्षण व आरोग्य विभागासह जिल्हा परिषदेच्या विविध कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी प्रत्येक प्रश्नाचे शांतपणे, स्पष्टपणे उत्तरे देत प्रशासनाची भूमिका मांडली.

## मोहोळ येथे ज्ञान माऊली या संगीतमय सोहळ्याचे आयोजन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्या पुढाकारातून राज्यभर विविध उपक्रमांनी साजरे केले जात आहे. ज्ञान माऊली या संकल्पनेवर आधारित तालुकास्तरीय विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता लोकसेवा कॉन्फरन्स हॉल मोहोळ येथे करण्यात आले आहे.



ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित ध्वनी चित्रफीत, शास्त्रीय नृत्य, ताटी उघडा ज्ञानेश्वरा, चांगदेव भेट, ज्ञानेश्वरी लेखन, ज्ञानेश्वर समाधी सोहळा या नाटिका सादरीकरणाबरोबरच हरिपाठ, वारी नृत्य, अभंग गायन होणार आहे,सामूहिक पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे

या उपक्रमाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार, साहित्य, जीवनचरित्र आणि त्यांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन तरुण पिढीपर्यंत तसेच येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. स्वरताल संगीत विद्यालय मोहोळ व श्री संत नामदेव जनाबाई वारकरी शिक्षण संस्था मोहोळ या संस्थेतील विद्यार्थी या सोहळ्यामध्ये सहभागी असणार आहेत. तालुक्यातील व जिल्ह्यातील स्थानिक कलाकार यात सहभाग घेणार आहेत. प्रवचनकार महादेव माने गुरुजी हे ज्ञानेश्वर समाधी सोहळा व पसायदान यावर प्रवचन देणार आहेत.

या कार्यक्रमात विद्यार्थी कलाकारांच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगांचे भावपूर्ण गायन सादर करण्यात येणार असून, त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग नाट्यरूपाने साकारले जाणार आहेत. भक्ती, संगीत, साहित्य, अध्यात्म आणि विचारांचा सुंदर संगम असलेला हा अनोखा संगीतमय सोहळा विद्यार्थ्यांसह सर्वांसाठी ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा विचार आणि त्यांची ज्ञानपरंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणाऱ्या या विशेष कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोहोळ तालुका बनावट दारूचे 'हब'...

पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे मोहीम राबविण्याची गरज आहे. दारूचा अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई होत असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा माहिती असूनही कारवाई न करणाऱ्या यंत्रणेतील घटकांचीही जबाबदारी निश्चित होणार का? याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

मोहोळ तालुका बनावट दारूचे केंद्र बनण्यापूर्वीच या प्रकाराला आळा घालणे आवश्यक असून, नागरिकांच्या जीविताशी खेळणाऱ्या या अवैध व्यवसायाविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## न्यासाकडून श्रद्धेला आधुनिकतेची जोड- माधुरीताई मिसाळ

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून श्रद्धेला आधुनिकतेची जोड दिल्याचे मनोगत राज्याचे नगरविकास राज्यमंत्री ना.माधुरीताई मिसाळ यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत



विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती,कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड,मोहन डांगरे यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविका आदीजण उपस्थित होते.

याप्रसंगी पुरोहित संजय कुलकर्णी, सिद्धाराम टाके, प्रदीप पाटील, बालाजी पाटील, प्रवीण देशमुख, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, आतिश पवार, एस.के स्वामी, सिद्धाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, नवनीत पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, रोहित कदम, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## संघर्ष हा जीवनातील सुंदर शब्द आहे- कॉ. तानाजी ठोंबरे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** मानवी जीवन हे संघर्षमय असून संघर्ष हा जीवनातील सुंदर शब्द आहे, यामुळे माणसाने अपयशाने खचुन न जाता संघर्षासाठी कायम तयार असले पाहिजे असे मत कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांनी मांडले विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णी यांच्या वतीने माजी आमदार बबनरावजी (दादा) शिंदे यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कर्मयोगी व्याख्यानमालेत महात्मा फुलेंचा शेतकरी याविषयी ते बोलत होते.शिक्षण हे माणसाला अंधारातून बाहेर काढण्याचे काम करते त्यासोबत अधिकार जागृती करते, माणसाला निर्भय बनवणारे ते शिक्षण अशी शिक्षणाची परिभाषा महात्मा फुले यांनी केली होती, महात्मा फुले यांनी त्यांच्या काळातील शेतकऱ्यांच्या व्यथा





मांडल्या शेतकऱ्यांची शोषण अज्ञाना मुळेच होते. यामुळे महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या शिक्षणासाठी खूप मोठे काम केले. महात्मा फुले हा देश शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांचा शोषितांचा मानत त्यामुळे या देशातील राजकारण्यांनी राजकारण हे शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या शोषितांच्या हितासाठी केले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. आजच्या काळातील शेतकऱ्यांची अवस्था फारशी बदलली नसून शेतकरी स्वतः पिकवलेल्या शेतमालाचा भाव ठरू शकत नाही, हे आजचे वास्तव त्यांनी मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र कदम यांनी केले, गेल्या सतरा वषार्पासून कर्मयोगी व्याख्यानमाला ही प्रबोधनाचा जागर करत असून आत्तापर्यंत विविध क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्ती प्रसिद्ध विचारवंत यांची व्याख्याने आयोजित करून महाराष्ट्राचा प्रबोधनाचा वारसा अतिशय खंबीरपणे महाविद्यालय जपत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार संजय मामा शिंदे होते. या कार्यक्रमाला विक्रमसिंह बबनरावजी शिंदे, बंडू नाना ढवळे, परमेश्वर खरात, सचिन होदाडे, नागेशबापू खटके, सचिन पवार प्रा. अशोक साळवे, प्रा. अशोक वाघमारे प्रा. डॉ. रविकांत शिंदे, टेंभुर्णी येथील पत्रकार, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी, सुनंदा विद्यानिकेतनचे सर्व शिक्षक, आर्या कॉलेज ऑफ फार्मसीचे सर्व शिक्षक विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रे नगर येथे लाभार्थी वास्तव्यास येण्यासाठी असलेल्या अडचणी सोडवल्या जाणार- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- रे नगर येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 30 हजार घरकुलाचा प्रकल्प सुरू आहे. यातील पंधरा हजार घरकुलाचे चावी वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेले आहे. परंतु ॲप्रोच रोड शाळा उद्योग व अन्य सोयी सुविधांच्या अभावामुळे बहुतांश लाभार्थी वास्तव्यास आलेले नाहीत. त्यामुळे येथे लाभार्थी येण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा लवकरच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात रे नगर संदभार्तील अडीअडचणीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन बोलत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, दक्षिण तहसीलदार किरण जमदाडे, म्हाडा सोलापूरचे देशमुख, रे नगर फेडरेशनचे सचिव युसुफ शेख, महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा समन्वयक प्रसाद मिरकले यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख तसेच अंकुर पांधे उपस्थित होते.




जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी रे नगर गृह प्रकल्पाची सर्व माहिती जाणून घेतली. व या ठिकाणी सर्व लाभार्थी वास्तव्यास येण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने येथील अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यामध्ये गारमेंट उद्योग रे नगर मध्ये उभारण्यात येणार आहे, त्यासाठी आवश्यक असलेले ट्रेनिंग सेंटर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास विभागाशी समन्वय साधण्यात येणार आहे. त्यानंतर या ठिकाणी पापड व बिडी उद्योग ही पुढील काळात सुरू केले जातील. तसेच रे नगरला राष्ट्रीय मार्ग पासून जोडण्यात येणारा अप्रोच रोड लवकरच म्हाडा मार्फत तयार करण्यात येईल. यासाठी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र जिल्हा परिषदेने त्वरित उपलब्ध करून देण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

शिक्षण विभागाने रे नगर येथे सुरू असलेल्या उर्दू व मराठी शाळेचे बांधकाम डिसेंबर 2026 अखेरपर्यंत पूर्ण करावे. या शाळेसाठी आवश्यक असलेला शिक्षक वर्ग अतिरिक्त समायोजनातून उपलब्ध करून घ्यावा. महिला व बाल विकास विभागाने येथे त्वरित अंगणवाडी सुरू करावी. ज्या लाभार्थ्यांना बँकेने गृह कर्ज दिलेले आहे त्या हप्ते न भरणाऱ्या लाभार्थ्यांनी बँकांचे कर्ज हप्ते वेळेत भरावेत. यासाठी रेनगर फेडरेशननेही लाभार्थ्यांना आवाहन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

तसेच रे नगर फेज टू अंतर्गतचे जमिनीचे विषयी महसूल प्रशासनाच्या वतीने लवकरच मार्गी लावण्यात येतील असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले. यावेळी म्हाडाचे देशमुख, रेनेगर फेडरेशनचे सचिव शेख, रेणगर गृह प्रकल्पाचे गुत्तेदार अंकुर पंदे यांनी रे नगर येथे लाभार्थी वास्तव्यास येण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक असलेल्या मदती विषयी माहिती बैठकीत दिली.

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी घेतला तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांना अधिक गती देण्यात यावी. तसेच आवश्यक त्या ठिकाणी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देऊन नागरिकांच्या आरोग्यविषयक अडचणी प्रभावीपणे सोडविण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिल्या.

अक्कलकोट पंचायत समितीच्या आरोग्य विभागाच्या वतीने एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आमदार कल्याणशेट्टी यांनी तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी ग्रामीण भागातील नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधा,



आरोग्य केंद्रांमधील विविध समस्या, आवश्यक सोयी-सुविधा तसेच नागरिकांना अधिक चांगली आरोग्यसेवा मिळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. आरोग्य विभागाने नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, अशा सूचना आमदार कल्याणशेट्टी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, आरोग्य विभागाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीस तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, सहायक गटविकास अधिकारी अमोल मुंडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अशोक राठोड, पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य सिद्धाराम शिवमूर्ती, विकास बुळा, विजय तानवडे, पंचायत समिती सदस्य विमल गव्हाणे, विनोद मोरे, अप्पासाहेब किवडे, उत्तम वाघमारे, शिवराज म्हेत्रे, विस्तार अधिकारी महेश भोरे तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## थकीत बिल द्या; पहिली उचल जाहीर करा; अन्यथा संघर्ष अटळ!

# थकीत ऊस बिलासाठी तहसीलदारांना निवेदन



**माढा (कटूसत्य वृत्त):-** ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलांसह आगामी गाळप हंगामातील ऊसदराच्या प्रश्नावर ऊस दर संघर्ष समितीची माढा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

मागील गाळप हंगामातील थकीत ऊस बिले तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत, या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांचा ऊस घेऊन त्याचे पैसे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कारखानदारांना आता जाब विचारला जाणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

तसेच आगामी गाळप हंगामात पहिली उचल किती देणार हे स्पष्टपणे जाहीर केल्याशिवाय कोणत्याही साखर कारखान्याने धुराडे पेटवू नयेत, अशी ठाम भूमिका बैठकीत घेण्यात आली. शेतकऱ्यांना दराबाबत अंधारात ठेवून गाळप सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला संघटितपणे विरोध करण्याचा निर्धार करण्यात आला.

याशिवाय गावभेट दौरे आयोजित करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. गावागावात जाऊन थकीत ऊस बिले, आगामी ऊसदर, पहिली उचल आणि शेतकऱ्यांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्याला या लढ्यात सहभागी करून घेण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.

'थकीत ऊस बिल मिळालेच पाहिजे, पहिली उचल जाहीर झालीच पाहिजे आणि शेतकऱ्याला त्याच्या उसाला योग्य व उच्चांकी दर मिळालाच पाहिजे. अन्यथा कारखानदारांविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष केला जाईल,' असा इशारा ऊस दर संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला.

बैठकीस स्वाभिमानी शेतकरी संघटना, रयत, शिवसेना, रासप यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी दीपक भोसले, सचिन पाटील, निवास नागणे, अमोल वेदपाठक, चंद्रकांत बागल, शिवाजीभाऊ पाटील, बापू गायकवाड मेजर, सुहास पाटील, अभिजीत साठे, अजित परबत, सत्यवान गायकवाड, देविदास खरात, मालोजी आडकर, मुस्तफा काझी, बालाजी चव्हाण, अतुल माने-पाटील, गोरख वाकडे, सचिन खैरे, बळीराम गायकवाड, वैभव साळुंखे, भागवत मुकणे, विलास उबाळे, नवनाथ उबाळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मजूर संस्थांना कामे व कर्जपुरवठ्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू - जिल्हा उपनिबंधक मुकुंदराव पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनच्या वतीने सोलापूर शहर तसेच उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील सभासदांचा स्नेहमेळावा बुधवार रोजी उत्साहात पार पडला. यावेळी लेबर फेडरेशनच्या सभासदांना प्रवासी बॅग व विविध भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा उपनिबंधक मुकुंदराव पवार उपस्थित होते. तसेच सहायक निबंधक आबासाहेब गावडे, कार्यालयीन अधीक्षक अर्जुन तांबट, जिल्हा लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर चौगुले, व्हाईस चेअरमन मुजीब शेख, संचालक चंद्रकांत अवताडे, राजाभाऊ सुपाते, संजय साळुंखे, अभिराज शिंदे, संस्थेचे सचिव फहीमोद्दीन शेख यांच्यासह शहर व दोन्ही तालुक्यांतील अनेक सभासद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत जिल्हा लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर चौगुले, व्हाईस चेअरमन मुजीब शेख व संचालक संजय साळुंखे यांनी केले प्रास्ताविकात चेअरमन शंकर चौगुले यांनी सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनच्या कायार्चा अहवाल उपस्थित मान्यवरांसमोर मांडला. मजूर सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न सुरू असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासकीय कार्यालये व सोलापूर महापालिकेच्या माध्यमातून मजूर संस्थांना अधिकाधिक कामे मिळावीत, यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा उपनिबंधक मुकुंदराव पवार यांनी मजूर सहकारी संस्थांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन सकारात्मक असून, वर्कऑर्डरच्या आधारे संस्थांना कर्जपुरवठा मिळवून देण्यासाठी डीसीसी बँकेमार्फत प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. व्हाईस चेअरमन मुजीब शेख यांनी मजूर संस्थांना अधिकाधिक कामे उपलब्ध करून देण्याची मागणी केली. संचालक अभिराज शिंदे यांनी कर्जपुरवठ्याचा प्रश्न मांडला. लोकमत अवॉर्ड २०२६ हा पुरस्कार मॉरिशस येथे मिळाल्याबद्दल संचालक संजय साळुंखे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यानंतर सभासदांनी विविध अडचणी व मागण्या मांडल्या. कार्यक्रमाच्या शेवटी आभार संजय साळुंखे यांनी मानले.

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ भीमा पाटबंधारे विभाग**
**उजनी कॉलनी, चंद्रभागानगर, पिन - ४१३३०४ पंढरपूर, जि. सोलापूर.**
**दूरध्वनी क्र. (कार्यालय) (०२१८६) २२३४६८**
**ईमेल:** bidppr@yahoo.com

**ई निविदा सुचना क्र. ११ सन २०२६-२०२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या https: //wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित किंमत रुपये लक्ष | जिल्हा | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२७ मध्ये माण नदीवरील को. प. बंधारा, कमलापूर ता. सांगोला येथील देखभाल व दुरूस्ती अंतर्गत बर्गे बसविणे, काढणे व अनुषंगिक कामे. | ८.४५ | सोलापूर | वर्ग ७ व त्यावरील |
| २ | सन २०२६-२७ मध्ये माण नदीवरील को. प. बंधारा बामणी ता. सांगोला येथील देखभाल व दुरूस्ती अंतर्गत बर्गे बसविणे, काढणे अनुषंगिक कामे. | ८.४५ | सोलापूर | वर्ग ७ व त्यावरील |
| ३ | भीमा पाटबंधारे विभागासाठी बाह्य यंत्रणेव्दारे वाहन चालकासह वाहन पुरवठा करणे. | ८.३८ | सोलापूर | वर्ग ७ व त्यावरील |

निविदा उपलब्ध कालावधी - दि. ०३/०९/२०२६ ते दि. १०/०९/२०२६.
निविदा सादर करण्याचा अंतीम दिनांक - १०/०९/२०२६.
निविदा उघडण्याचा दिनांक - ११/०९/२०२६

जा.क्र. भीपावि/लेशा निविदा / २५८९/२०२६.
भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर.
दि. १८/०८/२०२६
जिमाका/सो/जाहि/१२३/२०२६-२७

**सही/-**
**(ग. शं. कथले)**
**कार्यकारी अभियंता,**
**भीमा पाटबंधारे विभाग,**
**पंढरपूर.**

# अक्कलकोट तालुक्यात चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर

## चारा छावण्या सुरू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):** यंदाच्या खरीप हंगामात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने अक्कलकोट तालुक्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांच्या वाढीवर मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी पिके संकटात सापडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणींबरोबरच पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

पिकांमधून उपलब्ध होणारा चारा कमी झाल्याने जनावरांसाठी हिरवा तसेच कोरडा चारा मिळविणे कठीण होत आहे. कमी पावसाचा परिणाम ग्रामीण भागातील पाणीसाठ्यांवरही झाला असून विहिरी, तलाव आणि इतर जलस्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झालेला नाही. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

अनेक शेतकऱ्यांना जनावरांसाठी दूरवरून पाणी आणावे लागत असून चारा आणि पाण्याच्या वाढत्या टंचाईमुळे पशुधनाचे पालन करणे खर्चिक ठरत आहे. परिस्थिती अशीच कायम राहिल्यास शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



प्रशासनाने वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे तालुक्यात निर्माण झालेल्या परिस्थितीची प्रशासनाने तातडीने पाहणी करून वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. ज्या गावांमध्ये चारा व पाण्याची टंचाई तीव्र आहे, त्या गावांची स्वतंत्र नोंद घेऊन तेथे आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे.

चारा उपलब्धतेचा प्रश्न अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. चारा छावण्या सुरू झाल्यास जनावरांना नियमित चारा व पाणी उपलब्ध होऊन शेतकऱ्यांवरील आर्थिक तसेच मानसिक ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

पावसाची प्रतीक्षा करण्याबरोबरच संभाव्य चारा व पाणीटंचाईचा विचार करून प्रशासनाने आतापासूनच प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

## सुडोकु - 45

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 | | 7 | | | 6 |
| | 4 | | | | 6 | | | |
| 1 | 9 | | | | 4 | 7 | | 3 |
| | 7 | 8 | 4 | | | | 6 | 2 |
| | | 9 | 7 | | 3 | | 8 | 5 |
| | | | | 2 | | 3 | | 4 |
| | | 4 | 6 | | 2 | | | 1 |
| 2 | 5 | | 8 | | 1 | 6 | | |
| | 1 | 3 | | | 9 | | 2 | |

# मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची आ. अभिजित पाटील यांनी केली विचारपूस

**माढा (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटी येथे आंदोलनाला बसलेले संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांनी दि. १ सप्टेंबर रोजी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.



मराठा आरक्षणाच्या न्याय्य मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा हा चौथा दिवस असून, आंदोलनामुळे मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावत असल्याचे यावेळी दिसून आले. त्यांच्याशी संवाद साधताना जाणवणारा शारीरिक त्रास पाहून मन अस्वस्थ झाले, अशी भावना आमदार अभिजित पाटील यांनी व्यक्त केली.

'मायबाप सरकारने लवकरात लवकर मराठा आरक्षणावर सकारात्मक तोडगा काढावा. लाखो मराठा बांधवांच्या भावनांशी खेळू नये. मराठा आरक्षणाच्या न्याय्य हक्कासाठी सुरू असलेल्या या लढ्यात आपण ठामपणे सोबत आहोत,' अशी प्रतिक्रिया आमदार अभिजित पाटील यांनी व्यक्त केली.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीवर सरकारने सकारात्मक भूमिका घेत आंदोलनावर लवकर तोडगा काढावा, अशी अपेक्षाही आमदार पाटील यांनी व्यक्त केली.

# डॉ. रुपनवर यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ नातेपुतेत रास्ता रोको

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सातारा जिल्ह्यातील फलटण येथील रुग्णालयातील डॉ. राजेंद्र जगन्नाथ रुपनवर यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अधिकारी व संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी मंगळवारी नातेपुते येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला असून हजारो नागरिक सहभागी झाले होते.



या आंदोलनात आमदार उत्तमराव जानकर, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर, मार्केट कमिटीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, जिल्हा परिषद सदस्य गौतम माने, ॲड. समाधान पाटील, ज्ञानदेव पाटील, माऊली पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार राम सातपुते यांनी डॉ. रुपनवर यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या वैद्यकीय अधीक्षक, उपसंचालक तसेच इतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. डॉ. रुपनवर यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करून संबंधितांना अटक करावी आणि प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवावे, अशी मागणी त्यांनी केली.

माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर यांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. डॉ. राजेंद्र रुपनवर यांची प्रकृती सुधारली होती. त्यांनी आपण आता बरे झाल्याचे नातेवाईकांना सांगितले होते. त्यानंतर जबाब घेण्यात आला आणि जबाबानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच एका मोठ्या नेत्याच्या पी.ए.ला प्रमाणपत्र न दिल्यामुळे कारवाई करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. मंत्र्यांच्या पी.ए.ला अटक झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांनी डॉ. राजेंद्र रुपनवर हे मागील दोन महिन्यांपासून समाजमाध्यमांवर या प्रकरणासंदर्भात लिखाण करून आपल्या भावना व्यक्त करीत होते, असा दावा केला. उपसंचालक डॉ. भगवान पवार, मंत्र्यांचे पी.ए. प्रसाद कोंडे-देशमुख आणि डॉ. लीला मदने यांनी छळ करून त्यांना बडतर्फ केले व आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप त्यांनी केला. या तिघांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी जानकर यांनी केली. 'हा व्यवस्थेचा बळी आहे,' असेही त्यांनी म्हटले.

याप्रसंगी मांडवे येथील बंडू पालवे, ॲड. शरद रुपनवर, सोमा पिसे, हरणावळ आदींनी मनोगत व्यक्त केले. रास्ता रोको आंदोलनानंतर उपस्थित हजारो नागरिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी मार्गस्थ झाले.

डॉ. राजेंद्र रुपनवर यांच्या मृत्यूप्रकरणी विविध पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आलेले आरोप गंभीर असून, या आरोपांची निष्पक्ष व सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# मराठा सेवा संघाच्या दक्षिण भारतातील आठ राज्यांच्या सचिवपदी राम गायकवाड

**तुळजापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघाच्या दक्षिण भारतातील आठ राज्यांच्या सचिवपदी राम गायकवाड यांची, तर कर्नाटक व तेलंगणाच्या उपाध्यक्षपदी पोपट राम गायकवाड भोसले यांची निवड करण्यात आली आहे. मंगळवारी तुळजापूर येथे झालेल्या मराठा सेवा संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांच्या हस्ते राम गायकवाड व पोपट राम गायकवाड भोसले यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



यावेळी राष्ट्रीय सचिव सुनील महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्षा निर्मला पाटील, तानुबाई बिरजे पत्रकार कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष विलास पाटील, संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष योगेश पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. राम गायकवाड व पोपट राम गायकवाड भोसले यांच्या निवडीबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खुनाच्या आरोपाखाली झालेल्या जन्मठेपेच्या शिक्षेत युवकास जामीन मंजूर- ॲड.रितेश थोबडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रकाश अशोक चव्हाण रा. सोलापूर यांचा खून केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला भीमाशंकर सिद्राम झळके रा सोलापूर यास कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मिलिंद जाधव व नंदेश देशपांडे यांनी जामीन मंजूर केला.



या हकीकत अशी की, मयत प्रकाश याचे रेडिमेड कपड्याचे दुकान हे एमआयडीसी अक्कलकोट रोड येथे चालवीत होता. तसेच मयत हा भिशी देखील चालवत होता. ती भिशी मयत व आरोपी भीमाशंकर तसेच आणखीन एक आरोपी अशी तिघे मिळून चालवीत होते, त्यांच्यामध्ये भिशेच्या पैशाच्या देवाण-घेवाणी वरून वाद होता. दिनांकः- २४/०७/२०१७ रोजी दुपारी बारा वाजता मयत हा त्याच्या कपड्याच्या दुकानात गेला होता, त्यावेळी तो दुकानात एकटाच होता साधारण १:४५ वाजेच्या सुमारास प्रकाशच्या वडिलांना नातेवाईकांनी फोन केला की, प्रकाश यास जीवे ठार मारले आहे.

त्यावरून प्रकाशच्या वडिलांनी पोलिसांना दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सांगितले, त्या सीसीटीव्ही फुटेज कॅमेऱ्यामध्ये आरोपी भीमाशंकर व दुसरा आरोपी यांनी प्रकाश याच्यावर धारदार हत्याराने वार करून त्यास जीवे ठार मारल्याचे दिसत असल्याचे दिसून आले. त्यावरून पोलिसांनी तपास करून आरोपींना अटक केली होती. सदरचा खटला हा जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे चालला होता त्यात न्यायालयाने झळकीसह एकास खुनाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती.

त्यावर झळकी याने ॲड रितेश थोबडे यांचे मार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात अपील दाखल करून त्यामध्ये जामिनासाठी अर्ज दाखल केला होता.

जामीन अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ॲड.रितेश थोबडे यांनी आपले युक्तिवादात सरकारी पक्षाचा पुरावा हा केवळ सीसीटीव्ही फुटेजवर आधारित असून ज्या साक्षीदारांनी आरोपींना ओळखले त्यांची ओळख ही कागदोपत्री पुराव्याशी सुसंगत असली पाहिजे असा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायाधीशांनी 25,000/- रुपयाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

यात अर्जदार आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी तर सरकारतर्फे ॲड. अश्विनी टक्कळकर यांनी काम पाहिले.

# ११० गाईड विद्यार्थिनींचे दृष्टिबाधित बांधवांसोबत अनोखे रक्षाबंधन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून सामाजिक बांधिलकी, बंधुभाव आणि माणुसकी जपण्याचा दिवस आहे, हा संदेश देत सोलापूर भारत स्काऊट्स आणि गाईड्सच्या वतीने दृष्टिबाधित विद्यार्थ्यांसोबत आगळावेगळा रक्षाबंधन सोहळा साजरा करण्यात आला.

दि. १ सप्टेंबर रोजी एन.ए.बी. संचलित राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड येथे 'स्वनिर्मित रक्षाबंधन' हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात गाईड विद्यार्थिनींनी बाजारातून राख्या न आणता स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार करून दृष्टिबाधित विद्यार्थ्यांच्या मनगटावर बांधल्या. यावेळी बंधुभाव, आपुलकी, समानता आणि सामाजिक संवेदनशीलतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

या उपक्रमात मल्लिकार्जुन हायस्कूल (हत्तुरे वस्ती), नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल (नीलमनगर) आणि दिगंबर गुरुकुल प्रशाला (बाळेवस्ती) या शाळांमधील तब्बल ११० गाईड विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गाईड कॅप्टन विजयालक्ष्मी माळवदकर, तृप्ती खोबरे, सुनीता गांगुर्डे आणि जयश्री बिराजदार यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अंधशाळेचे मुख्याध्यापक शिंगाडे, जिल्हा संघटक (स्काऊट) श्रीधर मोरे, जिल्हा संघटक (गाईड) अनुसया शिरसाठ यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. स्वतःच्या हाताने राख्या तयार करून त्या दृष्टिबाधित विद्यार्थ्यांना बांधण्याच्या या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये हस्तकौशल्यासोबतच सामाजिक संवेदनशीलता, समतेची भावना आणि सेवाभाव रुजला. स्काऊट-गाईडच्या 'सेवा' या मूल्याचा प्रत्यक्ष अनुभव देणारा हा उपक्रम ठरला.

# विद्या विकास प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलमध्ये रक्तदान शिबिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्या विकास प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलाचे वर्धापन दिन व मा. आमदार बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर व वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कार्य असून, गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्ताचा साठा उपलब्ध राहणे अत्यंत आवश्यक आहे. याच सामाजिक जाणिवेतून संस्थेच्या वतीने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला संस्थेतील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच इतर स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण १४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सोलापूरचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद पवार (संचालक अउर हॉस्पिटल, सोलापूर) आणि सन्माननीय अतिथी मनोज बागल (पोलीस उपनिरीक्षक, सोलापूर) व संतोष काजळे (पोलीस उपनिरीक्षक, सोलापूर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख, व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड, संस्थेचे ट्रस्टी सौ. अनिता चव्हाण व रोहन देशमुख, संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व कॅम्पस संचालक डॉ. अरुण गायकवाड, तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. कुलकर्णी, व्ही.व्ही.पी. ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य प्रा. संतोष माने तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, 'रक्तदान हे केवळ सामाजिक कार्य नसून एखाद्याचे प्राण वाचविण्याचे महान कार्य आहे. प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडावी.ह्व शिबिरामध्ये रक्तदात्यांची प्राथमिक वैद्यकीय तपासणी करून तज्ज्ञ वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित पद्धतीने रक्त संकलन करण्यात आले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. याशिबिरास अक्षय रक्तपेढी, म. बसवेश्वर रक्तपेढी, अश्विनी रक्तपेढी व मार्कंडेय रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिबिर समन्वयक प्रा. संजय बुगडे व प्रा. अनिल काळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, मानवतावादी दृष्टिकोन आणि समाजसेवेची भावना निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष माने यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अविनाश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सह कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.रक्तदान शिबिराच्या माध्यमातून 'रक्तदान करा - जीवन वाचवा' हा मानवतावादी संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. विद्या विकास प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलामध्ये या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख तसेच व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# कुमठे प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाच्या अरमान शेखची राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण येथे नुकत्याच पार पडलेल्या ४०व्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कुमठे प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू व ब्रह्म स्पोर्ट्स क्लबचा विद्यार्थी अरमान अशपाक शेख याने उल्लेखनीय कामगिरी करत १८ वर्षाखालील ५ किलोमीटर चालण्याच्या (रेस वॉक) स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे अरमानची राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पधेर्साठी निवड झाली आहे.



अरमान शेख याच्या या यशाबद्दल त्याचा सत्कार करून त्याला राष्ट्रीय स्पधेर्साठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य विश्वस्त व नगरसेवक जयकुमार माने, ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकेचे संचालक शावरप्पा वाघमारे, कुमठे कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. संजय जाधव तसेच ब्रह्म स्पोर्ट्स अकॅडमीचे मार्गदर्शक विक्रम पवार उपस्थित होते.

यावेळी जयकुमार माने यांनी अरमानचे अभिनंदन करताना, ग्रामीण भागातील या खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून कुमठे गावाचे, सोलापूर जिल्ह्याचे आणि महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत अरमान शेख महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन दिलीपराव माने, विश्वस्त स्वाती माने आणि प्राचार्य अंबादास रेडे यांनी अरमानचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातून आलेल्या अरमानच्या या यशामुळे कुमठे परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राष्ट्रीय स्तरावरही तो निश्चितच चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अकलूजमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक सातच्या नवनिर्वाचित नगरसेविका कु. मृदुला महेश सूर्यवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हे शिबिर मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी कर्मवीर बाबासाहेब माने-पाटील बहुउद्देशीय सभागृह, जुना बाजारतळ, अकलूज येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले.

अकलूज नगरपरिषदेच्या लोकनियुक्त प्रथम नगराध्यक्षा सौ. रेश्मताई लालासाहेब अडगळे आणि गटनेते तथा उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, महंमदवाडी-हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक व नगरसेविका यांच्या पुढाकारातून हे आरोग्यदायी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिरामध्ये नागरिकांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया, डोळ्यांमध्ये लेन्स बसविणे तसेच डोळ्यांतील आजारांसंदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. डोळ्यांच्या चष्म्याचा नंबर तपासून आवश्यकतेनुसार सवलतीच्या दरात चष्मे उपलब्ध करून देण्याची सुविधाही देण्यात आली. शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर महंमदवाडी येथील रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येणार आहेत.

या शिबिरासाठी आरोग्य वैद्यकीय सभापती तथा नगरसेवक क्रांतीसिंह किशोरसिंह माने-पाटील आणि नगरसेविका कु. मृदुला महेश सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार नेत्र तपासणी व उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थित नागरिकांनी नगरपरिषद, आयोजक आणि एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्य

या कार्यक्रमास अकलूज नगरपरिषदेच्या लोकनियुक्त प्रथम नगराध्यक्षा सौ. रेश्मताई अडगळे तत्कालीन अकलूज ग्रामपंचायत माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, नगरसेविका सौ. मंदाकिनी पाडोळे,कु. उज्वलाताई विटकर, कु. मृदुलाताई सुर्यवंशी सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब आडगळे तसेच प्रभाग क्रमांक सातचे सर्व कार्यकर्ते,व शिबिरात तपासणीसाठी आलेले नागरिक व महिला नागरिक मोठ्या सख्येने उपस्थित होते.

# जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सोलापूर चॅप्टरचा आज पदग्रहण समारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO) या आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत संस्थेच्या सोलापूर चॅप्टरचा पदग्रहण समारंभ गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी गुजराती मित्र मंडळ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. सोलापुरात JITO चॅप्टर सुरू करण्यासाठी अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना आता मूर्त स्वरूप मिळत असून, यामुळे सोलापूरच्या उद्योजक व व्यावसायिक जगताला एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे, अशी माहिती अभय सुराणा यांनी दिली.

या पदग्रहण समारंभास JITO Apex, JITO ROM तसेच खक्लड चे विविध राष्ट्रीय व प्रादेशिक पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत JITO Solapur Chapter च्या नवीन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ संपन्न होणार आहे.

JITO ची स्थापना २००७ मध्ये झाली असून, आज देशभर तसेच परदेशातही संस्थेचे विविध चॅप्टर कार्यरत आहेत. संस्थेशी ९०,००० पेक्षा अधिक उद्योजक, व्यावसायिक आणि युवा सदस्य जोडले गेले आहेत. ज्ञानवृद्धी, आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक संपर्क आणि सेवा या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावणे, हे JITO चे प्रमुख उद्दिष्ट आहे.

"Business with Ethics and Community Service" या विचारातून JITO कार्यरत आहे. उद्योजकांची व्यावसायिक प्रगती साधण्याबरोबरच समाजासाठी योगदान देणे, हा संस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे.

सोलापूर JITO चॅप्टरच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकांना देशभरातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योजकांशी नेटवर्किंग, व्यवसायवृद्धीसाठी मार्गदर्शन, ज्ञानविनिमय, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती आणि नवीन व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक व्यावसायिक वातावरणात व्यवसाय वाढविण्यासाठी केवळ भांडवल पुरेसे नसून योग्य मार्गदर्शन, तंत्रज्ञान, कौशल्य, नेटवर्किंग आणि नवीन बाजारपेठांशी संपर्क आवश्यक आहे. या सर्व बाबींमध्ये JITO सोलापूरमधील प्रस्थापित तसेच नवोदित उद्योजकांना आवश्यक सहकार्य आणि प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देईल.

तसेच JITO MainChapter सोबत JITO Youth Wing आणि JITO Ladies Wing यांच्या माध्यमातून युवा आणि महिला उद्योजकांनाही व्यवसायवृद्धी, नेतृत्वगुण, कौशल्यविकास आणि नेटवर्किंगच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोलापूर हे उद्योग, व्यापार आणि व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर असून, येथील उद्योजकतेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक बळ मिळावे, यासाठी JITO Solapur Chapter महत्त्वाची भूमिका बजावेल,

असा विश्वास अभय सुराणा यांनी व्यक्त केला.

'सोलापूरच्या उद्योजकांना एकत्र आणून परस्परांच्या अनुभवातून शिकण्याची, व्यवसायाच्या नवीन संधी निर्माण करण्याची आणि समाजासाठी एकत्रितपणे काम करण्याची संधी JITO च्या माध्यमातून मिळणार आहे. आगामी काळात JITO Solapur Chapter सोलापूरच्या उद्योग व व्यापार क्षेत्राच्या प्रगतीसाठी निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावेल,' असे त्यांनी सांगितले.

# रेशीम दिनानिमित्त सोलापुरात डिजिटल रेशीम कार्यशाळेचा शुभारंभ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** 1 सप्टेंबर रेशीम दिनाचे औचित्य साधून जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष-एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प (ITDP), कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ व बाळे यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल रेशीम कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला.



**शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व बाजारपेठेची माहिती मिळणार**

'शेतकऱ्यांना रेशीम शेतीतील शास्त्रीय तंत्रज्ञान, आधुनिक व्यवस्थापन पद्धती आणि बाजारपेठेची माहिती मिळावी, तसेच उत्पादनाची गुणवत्ता व उत्पन्न वाढावे, या उद्देशाने डिजिटल रेशीम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या ३२ साप्ताहिक सत्रांचा रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच मोठा फायदा होईल.'

**-विनीत पवार,** जिल्हा रेशीम अधिकारी, सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात रेशीम उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतची मूल्यसाखळी विकसित करण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर रेशीम क्लस्टर विकसित करण्याचे नियोजन प्रस्तावित आहे. या अनुषंगाने रेशीम उत्पादक तसेच रेशीम शेतीत नव्याने सहभागी होऊ इच्छिणारे युवा व होतकरू शेतकरी यांच्यासाठी या डिजिटल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेअंतर्गत एकूण ३२ साप्ताहिक सत्रे घेण्यात येणार असून, प्रत्येक शुक्रवारी एक सत्र आयोजित केले जाणार आहे. तुती रोपलागवड व व्यवस्थापन, तुती बागेची निगा, रेशीम किड्यांचे संगोपन, रोग व कीड व्यवस्थापन, कोष उत्पादन व गुणवत्तावाढ, काढणीपश्चात प्रक्रिया तसेच कोषाची बाजारपेठ, विक्री व विपणन व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेच्या शुभारंभप्रसंगी जिल्हा रेशीम अधिकारी विनीत पवार, एपीएमसी हिरजचे विनोद पाटील, ITDPचे प्रकल्प समन्वयक रोहित अदमाने आणि कृषी पर्यटन तज्ज्ञ अविनाश एखंडे उपस्थित होते. यावेळी २४ रेशीम उत्पादक शेतकरी आणि रेशीम कोष खरेदीदार उपस्थित होते.